लोकमत

# मयूरी सावळकरचे बुद्धिबळमध्ये यश

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : ॲरो युनिर्व्हसिटी सुरत (गुजरात) येथे झालेल्या पश्चिम विभागीय विद्यापीठ स्पर्धेमध्ये शिवाजी विद्यापीठाच्या



बुद्धिबळ संघास कमला कॉलेजच्या मयूरी मुकुंद सावळकर हिने तृतीय क्रमांक मिळवून देण्यात महत्त्वपूर्ण वाटा उचलला. या यशामुळे विद्यापीठाचा संघ ऑल इंडिया आंतर विद्यापीठ बुद्धिबळ स्पर्धेसाठी पात्र ठरला आहे. मयुरीला डॉ. क्रांतीकुमार पाटील, प्राजक्त पाटील, प्राचार्य डॉ. तेजस्विनी मुडेकर, ज्योती गावडे यांचे मार्गदर्शन लाभले.

पुण्यनगरी

# ‘व्यवस्थापन शास्त्राचे मानकरी’ पुस्तकाचे प्रकाशन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागातील डॉ. ए. एम. गुरव व डॉ. आर. एस. साळुंखे लिखित ‘व्यवस्थापन शास्त्राचे मानकरी’ या पुस्तकाचा प्रकाशन समारंभ कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली झाला.

यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, डॉ. ए. एम. गुरव, पुस्तकाचे सहलेखक डॉ. आर. एस. साळुंखे, डॉ. के. व्ही. मारुलकर, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी. आर. पळसे आदी उपस्थित होते.

लोकमत

# 'केआयटी'मध्ये रंगणार आजपासून 'पायोनिअर'

## तांत्रिक स्पर्धा : दोन हजार विद्यार्थ्यांचा सहभाग

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** केआयटी अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये इंडियन सोसायटी फॉर टेक्निकल एज्युकेशन स्टुडंटस चॅप्टर अंतर्गत आज रविवारी (दि.२४) आणि सोमवारी (दि.२५) पायोनिअर ही राष्ट्रीय तांत्रिक स्पर्धा होणार आहे. स्पर्धेचे २५ वे वर्ष असून त्यामध्ये 'अभिव्यक्ती-आंतरविद्याशाखीय शोधनिबंध स्पर्धा', 'प्रकल्प-तांत्रिक विषयांवरील प्रकल्पांचे सादरीकरण' यासह प्रत्येक विभागामार्फत विविध तांत्रिक स्पर्धा होतील, अशी माहिती महाविद्यालयाचे विद्यार्थी उपक्रम अधिष्ठाता डॉ. अक्षय थोरवत यांनी पत्रकार परिषदेत दिली. या स्पर्धेचे उदघाटन आज रविवारी सकाळी साडेनऊ वाजता शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते, तर मर्सिडीज बेन्झचे जनरल मॅनेजर डॉ. उमेश देशपांडे यांच्या प्रमुख उपस्थितीत होईल. यादिवशी अभिव्यक्ती, प्रकल्प स्पर्धा होतील. त्यात शोधनिबंध, प्रकल्पांचे सादरीकरण होणार आहे. सोमवारी दिवसभर शार्क टॅंक-स्टार्टअप अँड बिजनेस आयडिया,आदी सात स्पर्धा होतील. दुपारी तीन वाजता इन्फोसाईट कन्सल्टिंगचे उपाध्यक्ष मनोज बी. एम. यांच्या प्रमुख उपस्थितीत बक्षीस वितरण होणार आहे. या स्पर्धेत देशभरातील सुमारे दोन हजार विद्यार्थी सहभागी होणार आहेत. केआयटीचे अध्यक्ष सुनील कुलकर्णी, उपाध्यक्ष साजिद हुदली, सचिव दीपक चौगुले, कार्यकारी संचालक डॉ. विलास कार्जिन्नी यांच्या मार्गदर्शनाखाली ही स्पर्धा होत आहे.

2 4 APR 2022
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठ-आयसीटीत करार

## कौशल्याची देवाण-घेवाण; अभियांत्रिकी, संशोधनावर भर



कोल्हापूर, ता. २३ : शिवाजी विद्यापीठाने उच्च गुणवत्तेचे अभियांत्रिकी शिक्षण आणि संशोधनासाठी इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजीसमवेत (आयसीटी, मुंबई) पाच वर्षांच्या कालावधीसाठी सामंजस्य करार केला. करारावर प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, आयसीटीतील अधिष्ठाता प्रा. डॉ. पद्मा व्ही. देवराजन यांनी स्वाक्षरी केली.

सहयोगी कार्यक्रम, इतर शैक्षणिक देवाण-घेवाण, शैक्षणिक आणि वैज्ञानिक सहकार्यावर आधारित परस्पर फायदेशीर संबंध प्रस्थापित करण्याच्या उद्देशाने सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली आहे. यातून नवीन तंत्रज्ञान-वर्धित संशोधन अपेक्षित आहे. हा सामंजस्य करार एक पाया असेल, नंतर आवश्यक असल्यास विशिष्ट विभागांसोबत स्वतंत्र सामंजस्य करार केले जातील.

सामंजस्य करारामुळे दोन्ही विद्यापीठांनी विविध संशोधन उपक्रम सुरू केले आहेत. त्याचे प्रस्ताव निधी संस्थांकडे सादर केले जातील. दोन्ही संस्थांमधील या समान स्वारस्य असणाऱ्यांना या सामंजस्य करारामुळे संयुक्त संशोधन आणि प्रकाशनाला आणखी गती मिळेल. विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांना त्यांची कौशल्ये वाढवण्यासाठी आयसीटीच्या विद्यार्थी व प्राध्यापकांच्या सहकार्याने काम करून त्यांचे ज्ञान वाढवण्यासाठी करार उपयुक्त ठरेल. हे संयुक्त संशोधन आणि प्रकाशनांच्या शक्यता विकसित करण्यासाठी संयुक्त चर्चासत्रे, परिषदा, कार्यशाळा आयोजित करून संबंधित अनुभव आणि कौशल्यांची देवाण-घेवाण करण्यास प्रोत्साहन दिले जाईल. करारप्रसंगी करारासाठी शिवाजी विद्यापीठातील प्रा. आर. जी. सोनकवडे, प्रा. के. वाय. राजपुरे, तर आयसीटीचे प्रा. आर. आर. देशमुख व प्रा. पी. आर. गागळे उपस्थित होते.

> **“ सामंजस्य करार प्राध्यापक, विद्यार्थी आणि इतर भागधारकांसाठी खूप उपयुक्त ठरेल. शिवाजी विद्यापीठाच्या विज्ञान विभागात, एसएआयएफ सीएफसी सेंटरसह आयसीटीच्या विविध कॅम्पसमध्ये उपलब्ध असणारी अत्याधुनिक उपकरणे वापरण्यासाठीचे कौशल्य एकमेकांस नक्की उपयुक्त ठरतील.**
> – प्रा. अनिरुद्ध पंडित, कुलगुरू, आयसीटी

> **“ अनेक प्रगत तंत्रे आणि कौशल्ये आयसीटी मुंबई येथे उपलब्ध आहेत. ज्यामुळे शिवाजी विद्यापीठातील विविध विज्ञान विभागांचे विद्यार्थी आणि प्राध्यापकांना मदत होईल. तथापि दोन संस्थांमध्ये सामंजस्य करार करण्यासाठी अथक प्रयत्नांमुळे दोन्ही बाजूचे विद्यार्थी आणि प्राध्यापक सदस्यांना फायदा होईल.**
> **– प्रा. आर. जी. सोनकवडे**